**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **'एक देश एक निवडणूक'साठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक ८ जानेवारी रोजी होणार.**
2. **ऑनलाईन व्यासपीठांवरचा धोका ओळखण्यासाठी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज तीन नव्या ऍपचं केलं उद्घाटन.**
3. **हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प 2.0 चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण.**
4. **विदर्भासह राज्याच्या विविध भागांमध्ये २६ ते २८ डिसेंबरदरम्यान मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज.**

**एक देश एक निवडणूक**

'एक देश एक निवडणूक' साठी, संयुक्त संसदीय समितीची, पहिली बैठक येत्या, आठ जानेवारी रोजी होणार आहे. भाजपाचे ज्येष्ठ खासदार, पी.पी.चौधरी यांच्या अध्यधतेखाली होणारी ही बैठक, प्रास्ताविक स्वरुपाची असणार आहे. कायदा आणि न्याय मंत्रालयाचे प्रतिनीधी, समितीच्या ३९ सदस्यांना या दोन्ही विधेयकांबद्दल माहिती देतील. संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक गेल्या मंगळवारी लोकसभेत सादर करण्यात आलं आणि गेल्या शुक्रवारी संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं.

**रामदेव बाबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग**

नागपूरच्या काटोल रोड स्थित, रामदेव बाबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या १९९९च्या तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांचे संमेलन आज आयोजित करण्यात आलं होते. याप्रसंगी, १९९९च्या तुकडीच्या रजत समारंभाप्रसंगी या तुकडीच्या माजी विद्यार्थीनी आणि केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाच्या, चित्रपट विभागाच्या संयुक्त सचिव, वृंदा देसाई यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. या माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून, आम्ही इथल्या विद्यार्थ्यांना नवीन काहीतरी देण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

***रामदेवबाबा युनिव्हर्सिटीमध्ये दरवर्षी जी बॅच २५ वर्षे कम्प्लिट करते ,तर त्या बॅच च इथं रि-यूनिअन आयोजित होत आणि इथल्या स्टुडंट्ससाठी पण खुप चांगलं आहे. कारण इट इज अ कनेक्ट बिटवीन अलुमनाय अँड द स्टुडंट्स आणि त्यांना पण एक मेंटरशिप मिळते आणि त्याच्यामुळे त्यांना प्लेसमेंटला किंवा समोरचा जीवनासाठी पन व्यवस्थित मार्गदर्शन मिळत आणि २५ वर्षांनंतर वापस येऊन स्टुडंट्स आपल्या कॉलेजला काय वापस देऊ शकत हा त्याच्या मागचा एक सुंदर विचार आहे.***

याप्रसंगी रामदेव बाबा विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ.राजेश पांडे यांनी सुद्धा, या आयोजना मागील भूमिका स्पष्ट केली आणि विद्यापीठातील सुविधांची माहिती दिली. रामदेव बाबा अभियांत्रिकी कॉलेजमधून, १९९९च्या तुकडीचे विद्यार्थी, आज आंतरराष्ट्रीय तसंच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये, उच्च पदावर कार्यरत आहेत.

## क्षयरोग निर्मूल

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम ही मोहिम, या महिन्यात सुरु झाली. या मोहिमेंतर्गत, निःक्षय ही रुग्ण व्यवस्थापन प्रणाली, राबवण्यात येत आहे. शंभर दिवसात, क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमानं पंजाब राज्यात वेग घेतला आहे. या अंतर्गत, क्षयाच्या प्रादुर्भावाची शक्यता असणाऱ्या, अठरा जिल्ह्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आलं आहे. याअंतर्गत बत्तीसशे चमूंनी आतापर्यंत वृद्ध, आजारी, धूम्रपान करणारे म्हणजेच या आजाराला बळी पडू शकतील अशा, एक लाख सहा हजार व्यक्तींची तपासणी केली आहे. यासाठी एक हजार ३०० निःक्षय शिबिरं आणि १४ निःक्षय वाहनं तैनात केली आहेत.

## राष्ट्रीय ग्राहक दिन

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्तानं ऑनलाईन व्यासपीठांवरचा धोका ओळखण्यासाठी आणि ग्राहकांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री, प्रल्हाद जोशी यांनी आज तीन नव्या ॲपचं उद्घाटन केलं. यात जागो ग्राहक जागो ॲप, जागृती ॲप आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे. या ॲपमुळ फसवणुकीच्या प्रकरणा विरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ॲपमुळ ग्राहकांना, URLची माहिती मिळणं शक्य होणार आहे. तसंच यातून काही धोका असल्यास, ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे. जागृती ॲपमुळ ग्राहकांना, URLची तक्रार करता येणार असून, सरकार ग्राहकांच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे असं, प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितलं. सुरक्षित, पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि ऑनलाईन व्यासपीठांवरील फसवणूक रोखण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचंही जोशी यावेळी म्हणाले.

## राष्ट्रीय मानवाधिकार आयोग

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेले न्यायमूर्ती, व्ही.रामसुब्रमण्यम यांची नियुक्ती, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. प्रियांक कानुंगो आणि निवृत्त न्यायमूर्ती, डॉ.विद्युत रंजन सारंगी यांचीही सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## सौर ग्राम

राज्यभरात सौर उर्जेचा वापर करणारे सौर ग्राम तयार करण्यात येत आहेत. यामुळ शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून, भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून, महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील असा विश्वास, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह इथं आयोजित कार्यक्रमात, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत, वाशिम जिल्ह्यातील उंबरठा आणि

धाराशिव जिल्ह्यातील, नारंगवाडी इथल्या प्रकल्पांचे लोकार्पण, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत आणि मोफत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना सोळा हजार मेगावॅट इतकी वीज देतो. हे सर्व फीडर सौरऊर्जेवर आणण्याचे काम दोन वर्षापासून सुरू केले आहे. टप्प्याटप्प्यानं हे सर्व फिडर, सौर उर्जेवर आणण्यात येतील. शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होऊ शकेल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला उंबरठा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

**आंदोलन**

भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यामध्ये पावसाळ्यामध्ये वैनगंगा नदी काठावरील असलेल्या गावांना पुराच्या वेढा राहत असून, यात शेतकऱ्यांची शेती बरेचदा पाण्याखाली जाते. त्यामुळ शेतकऱ्यांना फारसा उत्पन्न होत नाही. शेतकऱ्यांच्या नेमक्या मागण्यांबाबत एका शेतकऱ्यानं मनोगत व्यक्त केले....

***आमची बातमी अशी आहे कि गोसेखुर्दचा जो उजवा कालवा आहे, ० ते ३० पर्यंत याचा जवळपास १० वर्षांपूर्वी पासून काम १०० टक्के कंप्लिट झालेला आहे. तर बीच बीच मधी आम्हाला पाणी मिळत राहते उन्हाळीला आणि बीच बीच मधी प्रशासनाकडून पाणी थांबवल्या जाते पण प्रशासनाला आमची मागणी आहे २६ जानेवारी पर्यंत जर पाणी सोडलं तर आमची उन्हाळ्याची फसल चांगल्यानं होते.***

गोसेखुर्द धरणाच्या उजव्या कालव्यातील शेळी उपसा सिंचन सुरू करून पाणी सोडावे आणि तालुक्यातील शेतकऱ्यांना उन्हाळी धान पिकाकरिता पाणी उपलब्ध करून द्यावे या मागणीला घेऊन आज शेतकऱ्यांनी गोसेखुर्द धरण विभाग इथं शांततेच्या मार्गानं आंदोलन पुकारून, निवेदन सादर केलं आहे.

**इगनू**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती इथल्या अभ्यास केंद्रा अंतर्गत जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या सत्रातील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इग्नुच्या www.ignou.ac.in वेबसाईटवरून तसंच https://ignou-admission.samarth.edu.in ह्या लिंकवरून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५ असून, प्रवेश शुल्क इंटरनेट बँकींग/ डेबीट/ क्रेडीट/ एटीएम कार्डद्वारे, भरता येईल.

**फडणवीस टीका**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नागपुरात विमानतळावर आल्यावर त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी अमित शहा यांच्या वक्तव्यावरून विरोधी पक्षातर्फे देशभर आंदोलन सुरू आहे, याबाबत प्रश्न विचारला असता, मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वप्रथम काँग्रेस पक्षानं देशाची माफी मागावी कारण, अमित शहा यांचा अर्धवट व्हिडिओ ट्विट करून, त्यांनी संसदेचा आणि देशातील लोकांचा वेळ वाया घालवला. खरं म्हणजे

संसदेमध्ये बोलत असताना, ज्या प्रकारे मोदींनी, काँग्रेस पक्षाला एक्सपोज केलं आणि कशा प्रकारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आणि भारतातल्या संविधानातल्या आरक्षणाला देखील, नेहरू, इंदिरा आणि गांधी घराण्यातील लोकांचा, कसा विरोध राहिला हे पूर्ण पुराव्यासहित, जगासमोर आणलं. त्यामुळ आता काँग्रेस पक्ष अशा प्रकारे दिशाभूल करत आहे. महू असो अथवा दीक्षाभूमी यासर्व ठिकाणी बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृती जपण्याचं काम, भाजपा सरकारनं केल्याचं ते म्हणाले. काँग्रेसला केवळ, बाबासाहेबांचे नाव वापरून राजकारण करायचं आहे अशी टीका फडणवीस यांनी यावेळी केली.

**मोहन भागवत**

सोमलवार शिक्षण संस्थेचा, ७०वा संस्थापक दिन समारोह, येत्या २६ डिसेंबर २०२४ रोजी साजरा केला जात असून, या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक, डॉ.मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोमलवार हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, निकालस शाखेचे प्रांगण, खामला इथं सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होईल. सोमलवार एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, अण्णासाहेब सोमलवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं असून, डॉ.भागवत उपस्थितांना संबोधित करतील.

**हवामान**

विदर्भासह राज्याच्या विविध भागांत २६ ते २८ डिसेंबर दरम्यान मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २७ डिसेंबर रोजी पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी तर, २८ डिसेंबर रोजी, विदर्भाच्या काही भागांमध्ये, मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर या भागातल्या शेतकऱ्यांनी कृषि विषयक सल्ला आणि हवामानाच्या अंदाजाकडे लक्ष ठेवून, त्यानुसार नियोजन करावं असं आवाहन, कृषी विभागानं केलं आहे. विदर्भात आज बुलढाणा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, अन्य सर्व जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे. २५ आणि २६ तारखेला अर्थात उद्या आणि परवा, सर्वत्र कोरड हवामान राहणार असून, २७ आणि २८ तारखेला मात्र, मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर गडचिरोली आणि पश्चिम विदर्भातील यवतमाळ या ठिकाणी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे तर अमरावती, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशिम या ठिकाणी देखील, पाऊस पडू शकतो.

*****